राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

तक्रार क्रमांक-१००/२०२५/जळगाव व २८९/२०२६/ जळगाव व्दितीय अपील क्र.- ६१०९/२०२२/ जळगाव		
अ.क्र.	तपशील	
१.	श्री.जानकीराम बोमटु लोहार, रा. इंद्रप्रस्थ फेस-२, ई-७३ रायपुरा, जिला, रायपुर (छत्तीसगढ) - ४९२०१३	तक्रारदार
	विरूद्ध	
१.	निवासी नायब तहसिलदार,तहसील कार्यालय, पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव	उत्तरवादी क्र.१
२.	तहसिलदार, तहसील कार्यालय, पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव	उत्तरवादी क्र.२

(निर्णय दिनांक ०३/०८/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०३/२०२५ व दिनांक २३/०३/२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार एकाच माहिती अर्जासंदर्भात दोन तक्रार अर्ज दाखल केलेला आहेत. आयोगाने व्दितीय अपील क्रमांक **६१०९/२०२२/जळगाव** संदर्भात दिनांक २७/०३/२०२४ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २२/०८/२०२४ अन्वये आदेश पारीत केलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार **जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसील कार्यालय, पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव** यांनी कोणतीही कार्यवाही केली नसून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध अभिलेखावरुन आयोगाच्या असे निदर्शनास येते की, आयोगाने व्दितीय अपील क्रमांक **६१०९/२०२२/जळगाव** संदर्भात दिनांक २७/०३/२०२४ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २२/०८/२०२४ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा **निवासी नायब तहसिलदार, तहसील कार्यालय, पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव** यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्रमांक **६१०९/२०२२/जळगाव** संदर्भात दिनांक २२/०८/२०२४ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. **जिल्हाधिकारी, जिल्हाधिकरी कार्यालय, जळगाव, ता.जि. जळगाव** यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. **१००/२०२५/जळगाव** व **२८९/२०२६/जळगाव** अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

तक्रार क्रमांक- **१००/२०२५/जळगाव** व **२८९/२०२६/जळगाव** /जावक क्र.४१०० दिनांक-१२/०८/२०२६

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव, ता.जि. जळगाव

२. निवडनस्ती.